**चांद्रसेनीय कायस्थ  प्रभू एज्युकेशन सोसायटी**
१०१, पहिला मजला क्षितिज, शिवसेना भवन पथ, दादर (प), मुंबई : ४०००२८.
दूरध्वनी क्रमांक: ०२२-६५१६७७२८/ मोबाईल क्रमांक- ९९६९५२८३०७
ई-मेल: ckpeducation@rediffmail.com / ckpeducationsociety@gmail.com
वेबसाईट: **https://ckp.education/**

---

वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
२०२४-२०२५

संस्थेची १२४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता १०१,पहिला मजला, क्षितिज, शिवसेना भवन पथ, दादर (प), मुंबई : ४०००२८ येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे.

**-: सभेपुढील कामकाज :-**

१. दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून त्यास मंजुरी देणे.

२. १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील सोसायटीच्या कार्याचा अहवाल व हिशेब तपासनीसांनी तपासलेले जमाखर्च व ताळेबंद पत्रक संमत करणे.

३. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या मुदतीकरिता सरकारमान्य हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहेनताना ठरविणे.

४. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या वर्षाकरीताचे अंदाजपत्रक सादर करणे.

५. २०२५ -२०२८ या तीन वर्षाच्या कार्यकारणी मंडळाच्या निवडणुकीचा निकाल जाहीर करणे.

६. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयावर विचार करणे व निर्णय घेणे.

व्यवस्थापक मंडळाच्या संस्थेच्या आदेशावरून
आपले नम्र,
दिनांक :- १ सप्टेंबर २०२५
अजित प्र. कोंढवीकर
कार्यवाह

-: विशेष सूचना :-

१) घटना नियम नं . १५ अन्वये सर्वसाधारण सभेची गणसंख्या १५ इतकी आहे. गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्या दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व तिला गणपूर्तीचे बंधन राहणार नाही.

२) संस्थेचे एकूण २०६७ सभासद आहेत, अहवाल छपाई व टपाल यांचा खर्च बराच येत असल्यामुळे तसेच आधुनिक तंत्रज्ञान प्रणालीनुसार अहवाल इच्छुकांना संस्थेच्या कार्यालयात व संस्थेच्या वेबसाईट वर दिनांक १ सप्टेंबर २०२५ पासून उपलब्ध असतील.
( वेबसाईट: **https://ckp.education/**)

३) ज्या सभासदांना जमाखर्च व ताळेबंद पत्रक यासंबंधी सभेमध्ये प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले प्रश्न लेखी स्वरुपात दि. १० सप्टेंबर २०२५ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात सादर करावे. संस्थेच्या कार्यालयाची वेळ सोमवार ते शनिवार सकाळी १०:०० ते सायंकाळी ६:०० वा. वाजे पर्यंत आहे. रविवारी कार्यालय बंद असते याची नोंद घ्यावी.

४ ) सर्वसाधारण सभेस येताना सभासदांनी कृपया आपले ओळखपत्र सोबत आणावे.

५) संस्थेच्या इ-मेल आयडी वर आपला इ-मेल आयडी कळवण्यात यावा.